आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१२ ऑक्टोबर २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पाणबुडीरोधक नौका आयएनएस मंग्रोल नौदलात दाखल

- नागरिकांच्या घटनादत्त अधिकारांची पायमल्ली झाल्यास न्यायालयाचा हस्तक्षेप आवश्यक असल्याचं सरन्यायाधीशांचं प्रतिपादन

- महाराष्ट्रात एमपीएससीविरोधातलं आंदोलन मागे

**आणि**

- ज्येष्ठ लावणी कलावंत आणि अभिनेत्री मधु कांबीकर यांचं निधन

**<><><><><>**

उथळ पाण्यात काम करू शकणाऱ्या मान्ग्रोल या नावाच्या पाणबुडीरोधक नौकेला आज भारतीय नौदलाच्या ताफ्यात सामील करून घेण्यात आलं. मुंबईच्या नौदल गोदीमध्ये आज सकाळी हा समारंभ पार पडला. कोची इथल्या कोचीन शिपयार्ड ने या नौकांची निर्मिती केली आहे. नौदलाच्या ताफ्यात २००४ सालापर्यंत कार्यरत असलेल्या जलसुरुंगरोधक युद्धनौका आयएनएस मान्ग्रोल चा वारसा जतन करण्यासाठी हे नाव नवीन नौकेला दिलं गेलं आहे. या नौकेवर अभय सोनार उपकरणं, हलके टॉर्पेडो , स्वदेशी रॉकेट लॉन्चर तसेच मारीच आधुनिक टॉर्पेडो रोधक यंत्रणा बसवली आहे. देशातल्या बंदरांच्या संरक्षणासाठी या नौका उपयोगी ठरणार आहेत.

**<><><><><>**

राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला समता, स्वातंत्र्य, न्याय आणि आत्मसन्मान असे अनेक अधिकार दिले आहेत आणि त्यांची पायमल्ली झाल्यास न्यायालयांनी हस्तक्षेप करणं आवश्यक असल्याचं मत सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी व्यक्त केलं आहे. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या ३३ व्या स्थापना दिनानिमित्त नवी दिल्लीत आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते आज बोलत होते.

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने गेल्या ३३ वर्षांत २४ लाख तक्रारी दाखल करून घेतल्या असून त्यातल्या ९८ टक्के तक्रारींचं निरसन केल्याचं त्यांनी यावेळी नमूद केलं.

आयोगाच्या डिजिटल ऍप च्या लोकार्पणामुळे नागरिकांना तक्रारी दाखल करणं आणि पुढील प्रगतीचा आढावा घेणं सुलभ होईल अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

पोलीस कोठडीतले मृत्यू, वेठबिगारी, कामगारांचं शोषण अशा घटनांची नोंद घेणं तसंच वंचित घटकांच्या अधिकारांचं रक्षण करण्यासाठी आयोगाची भूमिका महत्त्वाची असल्याचं न्यायमूर्ती सूर्यकांत म्हणाले.

<><><><>

विरोधी पक्षांच्या आघाडीने न्यायालयात याचिका दाखल करावी. प्रत्येक भारतीय नागरिकाला न्यायालयात दाद मागण्याचे अधिकार आहेत आणि न्यायालय कायद्याच्या आधीन राहून त्यांना न्याय जरूर देईल असं सरन्यायाधीशांनी नंतर वार्ताहरांच्या प्रश्नांना उत्तर देताना सांगितलं. इंडीया आघाडीकडून आपल्या भेटीची मागणी करणारा अर्ज आपल्याला काल रात्री मिळाला असून आपण त्यांना का भेटू शकत नाही याची कारणं देणारं उत्तर आपण कालच दिलं असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

<><><><>

सध्याच्या जागतिक परिस्थितीत सर्वच देश एकमेकांवर अवलंबून आहेत आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य हा केवळ राजकीय पर्याय नव्हे तर जागतिक शांतता आणि समृद्धीसाठी त्याची नितांत आवश्यकता आहे असं उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत नॅशनल डिफेन्स कॉलेजच्या ६६ व्या तुकडीला ते आज संबोधित करत होते. हवामान बदल आणि दहशतवाद या जागतिक समस्यांना तोंड देण्यासाठी सर्व देशांनी एकत्र येऊन कृती करण्याची गरज आहे असं ते म्हणाले. वसुधैव कुटुम्बकम ही केवळ घोषणा नाही, तर जगात कुठेही आपत्ती आल्यास मदतीसाठी पुढे येणाऱ्या देशांमध्ये भारत नेहमीच अग्रस्थानी असतो असं त्यांनी सांगितलं.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून कामाला सुरुवात केली त्याला २५ वर्षं झाली. या काळात ते आधी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि नंतर भारताचे प्रधानमंत्री म्हणून सलग कार्यरत आहेत. जनसेवा ते देशसेवा असा हा प्रवास सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरुन विकसित भारत २०४७च्या दिशेने होत आहे. सर्वसमावेशक विकास, सामाजिक सक्षमीकरण, आणि समर्पण भावाचा हा प्रवास सर्वसामान्यांच्या जीवनात

आमूलाग्र बदल घडवून आणत आहे. यानिमित्तच्या विशेष मालिकेत आज आपण जाणून घेणार आहोत खेलो इंडीया योजनेबद्दल.

**होल्ड व्हिसी**

*(प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीमुळे भारताने क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. तळागाळापासून खेळातल्या प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी २०१० मधे गुजरातमधे खेल महाकुंभ आयोजित करण्यात आला होता. त्या धर्तीवर २०१७ मधे देशव्यापी स्तरावर खेलो इंडिया कार्यक्रमाला मान्यता देण्यात आली. शाळा महाविद्यालयं, आणि विद्यापीठ पातळीवर युवा क्रीडास्पर्धा आयोजित करण्यात येतात. आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळल्या जाणाऱ्या खेळांमधे गति असलेल्या युवा खेळाडूंना प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती आणि प्रशिक्षण दिलं जातं. खासदार आणि आमदारांना त्यांच्या मतदारसंघात अशा स्पर्धा आयोजित करता याव्या याकरता निधी दिला जातो. त्यातून अनेक खेळाडूंना पुढं येण्याची संधी मिळते. राष्ट्रीय पातळीवर दरवर्षी खेलो इंडिया स्पर्धा होतात. गेली अनेक वर्षं महाराष्ट्राने त्यात अव्वल स्थान मिळवलं आहे. या स्पर्धांमधून पुढं आलेले खेळाडू आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचं प्रतिनिधित्व करतात आणि देदीप्यमान यशही मिळवतात.)*

**<><><><><>**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पेपरफुटी विरोधात पुणे इथं सुरू असलेलं विद्यार्थी आंदोलन मागे घेण्यात आलं आहे. विद्यार्थ्यांच्या विविध मागण्या आमदार शिवेंद्रराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने मान्य केल्यानंतर हे आंदोलन मागे घेत असल्याचं जाहीर करण्यात आलं.

एमपीएससी पेपरफुटीप्रकरणी न्यायालयीन चौकशीची घोषणा सरकारने केली असून चौकशी पूर्ण होईपर्यंत एमपीएससीचे अध्यक्ष विवेक भिमनवार रजेवर राहतील.

**<><><><><>**

देशातल्या न्यायसंस्थे प्रतिमा मलीन करण्याचा आणि नागरिकांचा त्यांच्यावरचा विश्वास कमी करण्याचा प्रयत्न विरोधक करत आहेत, असा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केला. विरोधी पक्ष आज सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा काढून सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत यांना भेटून निवेदन देणार होते, मात्र सरन्यायाधीशांनी त्यांना भेटायला नकार दिला. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री मुंबईत वृत्तसंस्थेशी बोलत होते.

***होल्ड... बाईट- देवेंद्र फडणवीस***

अशा प्रकारे सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा काढणं हे राज्यघटनाविरोधी असल्याचंही फडणवीस म्हणाले. विरोधकांचा राज्यघटनेवर विश्वास नाही, हेच यातून सिद्ध होतं, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात इंडिया आघाडीचे नेते आज सर्वोच्च न्यायालयात याचिका सादर करतील, अशी माहिती राहुल गांधी यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासोबत आपण भारताच्या सरन्यायाधीशांना पत्र लिहून निवडणुकांच्या निःपक्षतेबाबत चिंता व्यक्त केल्याचंही ते म्हणाले. मतांच्या कथित चोरीविरोधात दिल्लीत अनेक दिवसांपासून आंदोलन सुरू असून लोकांना दिल्लीत पोहोचण्यापासून रोखलं जात असल्याचं गांधी म्हणाले.

दरम्यान, केंद्र सरकारने संसदेचं पावसाळी अधिवेशन संस्थगित करून मतदारसंघांच्या पुनर्रचनेबाबत सर्वपक्षीय चर्चा घडवून आणावी, मात्र, ही चर्चा अर्थपूर्ण व्हावी म्हणून आधी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा देणं आवश्यक असल्याचं काँग्रेसने समाज माध्यमावर म्हटलं आहे. ऑगस्ट महिन्यात १३ तारखेला संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आलं होतं. मात्र, पावसाळी अधिवेशन अद्याप अधिकृतपणे संस्थगित करण्यात आलेलं नसल्याचा दावा काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी केला आहे.

**<><><><>**

ज्येष्ठ मराठी अभिनेत्री आणि लावणी कलावंत मधु कांबीकर यांचं आज पुण्यात प्रदीर्घ आजाराने निधन झालं. त्या ७३ वर्षांच्या होत्या. गेल्या अनेक वर्षांपासून त्या पक्षाघाताच्या आजाराशी झुंज देत होत्या. अखेर आज त्यांची प्राणज्योत मालवली.

बीड जिल्ह्यातल्या माळेगाव खुर्द इथे २८ जुलै १९५३ रोजी मधु कांबीकर यांचा जन्म झाला. तमाशाच्या फडातून त्यांनी आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. व्यावसायिक रंगभूमीवर महाराष्ट्राची लोकधारा या कार्यक्रमात त्या लावणी सादर करत. लावणीसह अभिनयातही त्यांचं विशेष योगदान होतं. त्यानंतर राजदत्त यांच्या शापित या चित्रपटातून त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण केलं. त्यांनी आपल्या कारकिर्दीत बऱ्याच चित्रपटांमध्ये

काम केलं. ‘हेच माझं माहेर’, ‘राघू मैना’, ‘एक होता विदूषक’, ‘झपाटलेला’, ‘डेबू’ आणि ‘येऊ का घरात’ हे त्यांचे काही गाजलेले चित्रपट. व्यावसायिक रंगभूमी, लोकनाट्य, चित्रपट आणि दूरदर्शन मालिका अशा विविध माध्यमांमध्ये त्यांनी अभिनय आणि नृत्यकला सादर केली. ‘सखी माझी लावणी’ या कार्यक्रमातून मधु कांबीकर यांनी लावणीला जागतिक ओळख मिळवून देण्याचं काम केलं. मधु कांबीकर यांच्या निधनामुळे चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली आहे.

**<><><><><>**

कोळशावर चालणाऱ्या देशांतर्गत वीज प्रकल्पांमधला कोळशाचा साठा गेल्या महिन्याच्या २९ तारखेपासून १ कोटी ८० लाख टनांपेक्षा जास्त पातळीवर स्थिर राहिल्याची माहिती कोळसा मंत्रालयाने दिली आहे.

**//<><><><><>//**